# नाशिक महानगरपालिका, नाशिक

**मिळकत विभाग**

**राजीव गांधी, शरणपुर रोड, नाशिक-४२२००२**

**" जाहीर लिलाव नोटीस "**

---

**विषय**: मनपा मालकीच्या समाजमंदिर, व्यायामशाळा, शाळा इत्यादी मासिक / वार्षिक जागा लायन्सेस फी तत्त्वावर जाहीरलिलाव प्रक्रियेव्दारे वाटप करणेबाबत.

नाशिक महानगरपालिकेच्या मालकीचे नाशिकरोड,पंचवटी, नवीन नाशिक विभागांअंतर्गत समाजमंदीर, व्यायामशाळा, शाळा " जसे आहे तसे त्या स्थितीतील " मासिक/वार्षिक जागा लायन्सेस फी व इतर शासकीय कर भरण्याच्या तत्वावर जाहिर लिलाव प्रक्रिया गुरुवार दि. ०६ /०४/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिळकत विभाग राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक येथे आयोजित केले आहे. तरी इच्छुकांनी दर्शविलेल्या ठिकाणी/ दिवशी वेळेवर उपस्थित रहावे.

## लिलाव प्रक्रियेतील मिळकतींचा तपशील

१) नाशिकरोड विभागातील एकुण ९ मिळकती.

२) पंचवटी विभागातील एकुण २ मिळकती.

३) नवीन नाशिक विभाग एकुण १ मिळकत.

सदर जाहिर लिलावाची सविस्तर नोटीस मनपाच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर तसेच मिळकत विभाग राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक येथे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली आहे . याची नोंद घ्यावी.

लिलाव मान्य करणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणे याचा सर्वस्वी अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक, नामनपा, यांचा राहील.

| | | |
|---|---|---|
| sd/-xxx | sd/-xxx | sd/-xxx |
| मिळकत व्यवस्थापक | उपआयुक्त (मिळकत) | आयुक्त तथा प्रशासक |
| नाशिक महानगरपालिका नाशिक | नाशिक महानगरपालिका नाशिक | नाशिक महानगरपालिका नाशिक |

# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## मिळकत विभाग
## राजीव गांधी, शरणपुर रोड, नाशिक-४२२००२
## " जाहीर लिलाव नोटीस "

नाशिक महानगरपालिकेच्या मालकीचे पंचवटी,नाशिकरोड, नविन नाशिक विभागातील संस्था / मंडळ यांनी मागणी केलेल्या मिळकती भाडेतत्वावर देणे कामी जाहिर लिलाव प्रक्रिया गुरुवार दि. ०६ / ०४ /२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिटींग हॉल, तिसरा मजला, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक येथे घेण्यात येणार आहे. तरी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा असेल त्यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या ठिकाणी / दिवशी वेळेवर उपस्थित रहावे.

लिलाव प्रक्रियेतील मिळकतीचा तपशिल

| अ. नं. | मिळकतीचे नाव | बांधिव क्षेत्र | सुरक्षा अनामत एक वर्षाचे आगाऊ भाडे | भाडेपटटा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पंचवटी प्र.क्र.०२ मधिल बिडीकामगार नगर व निलगिरीबाग परीसरात मनपा मालकीच्या ओपनस्पेस मध्ये आधारकेद्रासाठी जागा देणे बाबत. | १० बाय १० फुट | ९२७५/- | ५वर्षे |
| २. | पंचवटी विभगातील सि.टी.सर्व्हे न.३०६ मधिल गणेशवाडी येथील शाळा क्र. ३० (रिक्त) भाडेकराराने देणे बाबत. | ७७८.६४ चौ.मी. | ३१,९३,०००/- | ५वर्षे |
| ३. | छत्रपती शिवाजी महाराज समाज मंदिर भाडेतत्वावर देणे बाबत. | ३३२.३० चौ.मी | ७,९५,५६५/- | ५वर्षे |
| ४ | नारोड मनपा विभागीय कार्यालयात जव्हार मार्केट येथिल एक खिडकीची रुम भाडेतत्वावर देणे | २५.८० चौ.मी. | १,२२,८९०/- | ५वर्षे |
| ५ | नारोड मनपा विभागीय कार्यालयात जव्हार मार्केट,जुनी इमारत येथिल एक खिडकीची रुम भाडेतत्वावर देणे | १६.१५ चौ.मी. | ७६,९२५/- | ५वर्षे |
| ६ | ना.रोड विभगातील तरण तलावाच्या वरच्या मजल्या वरील रिकामा हॉल भाडेतत्वावर देणे बाबत.१७.२० बाय ९.४० | १६१.६८चौ.मी . | १,७७,०५०/- | ५वर्षे |
| ७. | ना.रोड विभगातील तरण तलावाच्या वरच्या मजल्या वरील रिकामा हॉल भाडेतत्वावर देणे बाबत.२३.४० बाय ९.४० | २१९.९६चौ.मी . | २,४०,८६५/- | ५वर्षे |
| ८. | ना.रोड विभगातील तरण तलावाच्या वरच्या मजल्या वरील रिकामा हॉल भाडेतत्वावर देणे बाबत.बाबत.१२.१५ बाय ६.०० | ७२.९०चौ.मी. | ७९,८३०/- | ५वर्षे |
| ९. | ना.रोड विभगातील तरण तलावाच्या वरच्या मजल्या वरील रिकामा हॉल भाडेतत्वावर देणे बाबत.बाबत.१०.५० बाय ६.०० | ६३.०० चौ.मी. | ६८,९९०/- | ५वर्षे |
| १०. | ना.रोड विभगातील तरण तलावाच्या वरच्या मजल्या वरील रिकामा हॉल भाडेतत्वावर देणे बाबत.बाबत.२७.५० बाय ९.८० | २६९.५० चौ.मी. | २,९५,११५/- | ५वर्षे |
| ११ | ना.रोड विगातील जेलरोड येथील शाळा क्र,११ व ११३, भाडेतत्वावर देणे बाबत. | बांधिव क्षेत्र ८६१.५० चौ.मी.खुली जागा १४३०.८२ चौ.मी. | १२,४२,८५५/-- | ५वर्षे |
| १२. | नविन नाशिक विभागामील प्र.क्र.२७ मधील वीर सावरकर सभागृह भाडेतत्वावर देणे बाबत. | १५६.६३ चौ.मी. | ३,१५,२०५/- | ५वर्षे |
| | | | | |

सदर जाहिर लिलावाची सविस्तर नोटीस मनपाच्या www.nmc.gov.in या संकेतस्थळावर तसेच, राजीव गांधी, भवन शरणपुर रोड, नाशिक येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली आहे याची नोंद घ्यावी. सदचा लिलाव मान्य करणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणे याचा सर्वस्वी अधिकार मा.आयुक्त तथा प्रशासक, मनपा, नाशिक यांचा राहील.

xxxsd/-
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका, नाशिक

# नाशिक महानगरपालिका नाशिक
## मिळकत विभाग
## जाहिर लिलावाच्या अटी-शर्ती

१) सर्व सुविधा संस्था/मंडळाने पुरवावयाच्या आहेत. त्याप्रमाणे तेथील सर्व उपकरणे/साहित्य इ. दुरुस्ती/देखभाल ही संस्था/मंडळाने स्वखर्चाने करावी लागेल.

२) संस्था/मंडळाने मासिक जागा लायसेंस फी व्यतिरिक्त वीज बिल/पाणी बिल /घरपट्टी व शासनाचे कर इ. संस्था/मंडळाने भरावयाचे आहे.

३) संस्था/मंडळाला नियमित वेळेत मिळकतीतील कार्यालय सुरु ठेवावे लागेल व संस्था/मंडळाने व्यवसाय व्यतीरिक्त इतर कुठलाही व्यवसाय /धंदा सदर मिळकतीत करता येणार नाही.

४) संस्था/मंडळाकडुन सदर जागेत मद्यपान अथवा इतर आक्षेपार्ह वर्तन होणार नाही याची दक्षता घ्यावी. व तसे आढळल्यास करार रद्द केला जाईल व कुठलाही गैरप्रकार घडल्यास त्यात संस्था/मंडळावर पुर्णत: जबाबदार राहील. तसेच याबाबत संस्था/मंडळे स्वत: कायदेशीर कार्यवाही करतील व त्याची माहिती मनपास लेखी स्वरुपात कळवतील.

५) संस्था/मंडळा कडुन कुठलेही प्रकारचे आक्षेपार्ह वर्तन होत नाही हे तपासणेचा अधिकार मनपास राहिल. हयासाठी मा. आयुक्त/अतिरिक्त आयुक्त/उपआयुक्त व संबंधित विभागाचे विभागीय अधिकारी हे अथवा यांनी अधिकार प्रदान केलेले अधिकारी/कर्मचारी केव्हाही पाहणी करु शकतील. संस्था/मंडळाने त्यांना त्याप्रमाणे सहकार्य करणे सक्तीचे राहिल.

६) संस्था/मंडळाला प्रत्येक महिन्याचे भाडे जागा लायसेंस फी सह वस्तु व सेवाकर तसेच इतर शासकीय कर हे आगाऊ स्वरुपात प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत भरावे लागेल. संस्था/मंडळाना वापरावयास दिलेली जागा त्यांनी स्वखर्चाने स्वच्छ व निटनेटकी ठेवणे सक्तीचे राहिल.

७) संस्था/मंडळाकडुन अथवा त्याचे कर्मचा-यांकडुन परिसराचे सौंदर्यात बाधा येता कामा नये. तसेच जागेचा परिसरात येणारे व्यक्तिंना/वाहनांना कुठल्याही प्रकारचा त्रास/नुकसान होता कामा नये.

८) संस्था/मंडळाने अधिकृत नोंदणी पत्र, सदस्यांची कार्यकारीणी, इत्यादी आवश्यकतेनुसार अधिकृत नोंदणी पत्र एक प्रत संबंधित विभागीय अधिकारी यांना देणे बंधनकारक असेल.

९) संस्था/मंडळाने पुरवित असलेल्या सेवेमुळे परिसरात इतरत्र अस्वच्छता होता कामा नये. झाल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

१०) संस्था/मंडळाने बांधकामाचे मुळ रचनेत कुठलाही प्रकारचा बदल करुन नये व बांधकामास धोका होणार नाही याची काळजी घ्यावी.

११) संस्था/मंडळाना त्याठिकाणी नाम फलक लावता येईल. तसेच परिसरात इतरत्र कोठेही पुर्व परवानगी शिवाय फलक लावता येणार नाही.

१२) संस्था/मंडळाला दिलेल्या जागे व्यतिरिक्त इतर परिसरात संस्था/मंडळाचा कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. भविष्यात प्रस्तावित आराखडयात बदल करावयाचा झाल्यास वाढीव मजल्यावरील बांधकामाचा हक्क मनपाने राखुन ठेवला आहे. अनामत रक्कम रुपये म्हणुन १ वर्षाचे भाडे लायन्सस फी इतकी राहील. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१३) संस्था/मंडळाने मासिक/वार्षीक जागा लायसेंन्स फी व त्या व्यातिरिक्त सरकारी करांचा भरणा करणे बंधनकारक राहील. मात्र मुदत संपुष्टात आल्यानंतर अशा करांचा भरणा निघाल्यास तो संस्था/मंडळाच्या मालमत्ता करातून वसूल करण्यात येईल.

१४) संस्था/मंडळाने त्यांना देण्यात आलेल्या जागा स्वत:च वापरावयाची आहे. जागेचे कोणत्याही प्रकारचे हस्तांतर, पोटभाडेकरी, बक्षिस, गहाणखत असाईनमेंट देता येणार नाही अगर सदर जागा परस्पर दुस-यास बहाल करता येणार नाहीत. तसेच जागेवर कोणत्याही प्रकारचे कोणत्याही संस्थेकडून अथवा बँकेकडून कर्ज काढता येणार नाही. असे आढळून आल्यास योग्य ती कायदेशिर कार्यवाही करण्याचे अधिकार नाशिक महानगरपालिकेस राहील. संस्था/मंडळाने दिलेल्या जागेचा उपयोग ठरवुन दिलेल्या उद्देशासाठीच

केला पाहिजे. संस्था/मंडळाने कुठल्याही प्रकारचा पोट भाडेकरी व तत्सम प्रकार करता येणार नाही.

१५) महानगरपालिकेस सार्वजनिक हितार्थ अथवा इतर कोणत्याही कारणास्तव सदर जागांची आवश्यकता असल्यास संस्था/मंडळाने नोटीस दिल्यानंतर तीस दिवसांच्या आत सदर जागा विनाहरकत महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याचे बंधनकारक आहे.

१६) संस्था/मंडळाना देण्यात आलेल्या जागेत इतर वापर अथवा नुकसान आढळून आल्यास त्याची नुकसान भरपाई संस्था/मंडळा कडुन वसूल करण्यात येईल व सदर जागेचा करार रद्द करण्यात येईल.

१७) संस्था/मंडळाना देण्यात आलेली जागेबाबत तक्रार व सार्वजनीक वाद निर्माण झाल्यास व सदरची जागा संस्था/मंडळाना नको असल्यास त्याबाबत संस्था/मंडळाने महानगरपालिकेस ३० (तीस) दिवस अगोदर लेखी कळविणे बंधनकारक आहे. मुदतीत न कळविल्यास सदर जागेची दरमहाची जागा लायसेंस फी भरणे बंधनकारक आहे.

१८) संस्था/मंडळाला सदर जागेत व आसपास असलेले झाड किंवा झाडांच्या फांदया विनापरवानगी / परस्पर तोडता येणार नाही. संस्था/मंडळ, फक्त महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या जागेवरच आणि करारत उल्लेखीलेल्या कालावधीतच सदर जागेचा वापर करेल व सुव्यवस्थित राहील हे पाहणे संस्था/मंडळाची जबाबदारी असेल. या सर्व अटी-शर्तीबाबत वाद उत्पन्न झाल्यास मनपाने ठरविलेला निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१९) संस्था/मंडळाने वरील पैकी करारनाम्यातील अटी-शर्तीचा भंग झाल्यास संस्था/मंडळास मनपा. मार्फत ३० दिवस अगोदर लेखी सुचना देऊन करार रद्द केला जाईल व जागा ताब्यात घेतली जाईल व अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

२०) संस्था/मंडळाने लिलाव बोली र.रु.१००/- च्या पटीत बोलावी व किमान तिन बोली आल्याशिवाय लिलाव कायम करण्यात येणार नाही.

२१) संस्था/मंडळाना पोलिस विभागाकडील व नाशिक मनपा अग्नीशमन विभागाकडील सुचनांचे , अटी/शर्तीचे पालन करावे लागेल.

२२) संस्था/मंडळाना जाहिर लिलाव नोटीस मध्ये ज्या मोजमापाची जागा असेल त्या जागेपेक्षा इतर जादा जागेचा वापर करता येणार नाही.

२३) संस्था/मंडळाने जाहिर लिलावाचे बोली रक्कम प्रमाणे प्रथम तिन महिन्याची जागा लायसेंन्स फी व शासकीय करांचा भरणा आगाऊ स्वरुपात लिलावाचे तारखे पासुन तिन दिवसात मनपा खजीन्यात भरावी लागेल त्याशिवाय जागेचा ताबा मिळणार नाही. तसेच सदर रक्कम मुदतीत न भरल्यास भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. व जागा दुस-या इतर पात्र संस्था/मंडळाना देण्याची कारवाई करणेत येईल.

२४) कोणत्याही प्रकारे नैसर्गिक/ अनैसर्गिक अगर इतर कोणत्याही कारणाने काही नुकसान झाल्यास त्यास महानगरपालिका कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस जबाबदार रहाणार नाही.

२५) संस्था/मंडळाने यदा कदाचित काही कारणास्तव लिलाव धारकाने जागेचा वापर न केल्यास प्रथम तिन महिन्याची भरलेली जागा लायसेंन्स फी व इतर कराची रक्कम परत केली जाणार नाही.

२६) संस्था/मंडळाला वरील पैकी कुठल्याही नियमात आवश्यकतेप्रमाणे बदल करणेचा अथवा अधिक नियमांची भर घालणेचा अधिकार मा. आयुक्त यांना असेल व त्याची अंमलबजावणी करणे संस्था/मंडळाना बंधनकारक असेल.

२७) लिलावाची प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित करण्याचे अधिकार मा. आयुक्ताचे राहील.

वरील अटीशर्तीपैकी कोणत्याही अटींशर्तीचे उल्लंघन झाल्यास करारनामा रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त सो. नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना राहील.

| | |
|---|---|
| xxx/-sd | xxx/-sd |
| मिळकत व्यवस्थापक | उपआयुक्त (मिळकत ) |
| नाशिक महानगरपालिका, नाशिक | नाशिक महानगरपालिका, नाशिक |